# || श्री दत्त आश्रम जालना ||

## || श्री दत्त महाराज ||

संध्याकाळची नित्य उपासना...............

### ध्यानमंत्र

ब्रह्मानंदं परमसुखदम केवलं ज्ञानमूर्तिम |

व्दंव्दातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्षम |

एकं नित्यं विमलमचलमं सर्वधी साक्षिभूतम् |

भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरूं तं नमामि || १ ||

गुरूब्रह्मा गुरूर्विष्णुः गुरूदेवो महेश्वरः |

गुरू साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः || २ ||

# आरती श्री सद्गुरू दत्तमहाराजांची

आरती दत्तराजयाची । धुंडीराज सुपुत्राची ॥ धृ ॥
पुण्यग्रामी तूं वससी ।
भक्ता पावन तूं करीशी ॥
भजती त्याते उध्दरिसी ॥
न भजती त्यांहि कृपा करीशी ॥
पुरूषोत्तमा तूं अवतारा ॥ ( २ )
शरण येऊन । विनीत होवून । धूलि घेईन ।
श्री गुरू आपुल्या चरणांची ।
किमया पावन करण्याची ॥ १ ॥ आरती दत्त......

भागवतावरी तव प्रीती ।
स्वकुळी गणेश दत्त भक्ती ॥
ज्ञानी विद्यावाचस्पती ।
अंकीत कुंडलीनी शक्ती ॥
कवीश्वरा तूं ईश्वरा । ( २ )
जगती प्रगटून । लीला दावून । तरीहि लपवून ।
ठेविली ओळख स्वरूपाची ।
गाईन लीला कीर्तीची ॥ २ ॥ आरती दत्त......

शुभ्र वस्त्र शुचिचे ल्याले ।
वात्सल्या मूर्त रूप आले ।
ज्ञाना विनये शोभविले ।
ब्रह्म साकारूनि आले ।
भक्तवत्सला दयघना । ( २ )
दृष्टीने करूण । मजला बघून । जवळी घेवून ।
वर्षा करी बा ममतेची ।
मागीन भीक्षा भक्तीची ॥ ३ ॥ आरती दत्त......( २ )

# श्री दत्तात्रय सद्‌गुरूंची आरती

करितों प्रेमे तुज नीरांजन स्थिरवुनियां मन ॥
दत्तात्रेया सद्‌गुरूवर्या भावार्थे करून ॥ धृ. ॥

धरणीवर नर पीडित झाले भवरोगें सर्व ॥
कामक्रोधादिक रिपुवर्गे व्यापुनि सगर्व ।
योग याग तप दान नेणती असतांहि अपूर्व ॥
सुलभपणे निजभजनें त्यांसी उध्दरी जो शर्व ॥

करीतों प्रमें ॥ १ ॥

अत्रिमुनींच्या सदनीं तीनी देव भुके येती ॥
भिक्षुक होऊनि अनसुयेप्रति बोलति त्रयमुर्ती ॥
नग्न होऊनि आम्हांप्रति द्या अन्न असें वदती ॥
परिसुनि होऊनि नग्न अन्न दे तंव ते शिशु होती ॥

करीतों प्रमें ॥ २ ॥

दुर्वासाभिध मौनी जाहला शंभु प्रमथेंद्र ॥
ब्रह्मदेव तो जाहला चंद्र जाहला तो उपेंद्र ॥
दत्तात्रेय जो वीतनिद्र तो तारक योगींद्र ॥
वासुदेव यच्चरण चिंतुनी हो नित्यतंद्र ॥

करीतों प्रमें ॥ ३ ॥ ( २ )

# || श्रीपाद श्रीवल्लभप्रार्थनास्त्रोत्र् ||

# अर्थात्

# || अघोरकष्टोद्धरणस्तोत्रम् ||

श्रीपाद श्री वल्लभ त्वं सदैव | श्रीदत्तास्मान्पाहि देवाधिदेवा |
भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते | घोरात् कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते || १ ||

त्वं माता त्वं पिताऽऽप्तोऽधिपस्त्वं | त्राता योगक्षेम कृत्सद्गुरूस्त्वम् |
त्वं सर्वस्वं नोऽप्रभो विश्वमूर्ते | घोरात् कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते || २ ||

पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं भीतिं क्लेशं त्वं हराऽशुत्वदन्यम्
त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते | घोरात् कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते || ३ ||

न्यान्यस्त्राता नापि दाता न भर्ता | त्वत्तो देवत्वं शरण्योऽकहर्ता |
कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते | घोरात् कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते || ४ ||

धर्मे प्रीतिं सन्मतिं देव भक्तीम् | सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम्
भावासक्तिं चाखिलानंद मूर्ते | घोरात् कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते || ५ ||

श्लोकपंचकमेतद्यो लोक मंगल वर्धनम्
प्रपठेन्नियतो भक्त्या स श्री दत्तप्रियो भवेत् || ६ ||

इति श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्री वासुदेवानन्दसरस्वती विरचितं
अघारकष्टोद्धरणस्तोत्रं संपूर्णम् ||

## ॥ करूणात्रिपदी ॥ ( उद्धवा शांतवन कर )

## ॥ पद १ ॥

शांत हो श्री गुरूदत्ता मम चित्ता शमवी आतां ॥ धृ. ॥
तूं केवळ मामा जनिता, सर्वथा तूं हितकर्ता
तूं आप्तस्वजन भ्राता, सर्वथा तूंचि त्राता
(चाल) भयकर्ता तूं भयहर्ता । दंडधर्ता तूं परिपाता । तुजवांचुनि न दुजी वार्ता ।
तूं आर्ता आश्रय दत्ता, मम चित्ता शमवी आतां ॥ १ ॥

अपराधास्तव गुरूनाथा जरि दंडा धरिसी यथार्था ।
तरि आम्हीं गाऊनि गाथा तव चरणीं नमवूं माथा
(चाल) तूं तथापि दंडिसि देवा । कोणाचा मग करू धावां । सोडविता दुसरा तेंव्हा
कोण दत्ता आम्हां त्राता, मम चित्ता शमवी आतां ॥ २ ॥

तूं नटसा होउनी कोपी, दंडिताही आम्ही पापी
पुनरपिहि चुकत तथापि, आम्हांवरि नच संतापी
(चाल) गच्छतः स्खलनं क्वापि । असे मानुनि नच हो कोपी । निज कृपालेशा ओपी ।
आम्हांवरि तूं भगवंता, मम चित्ता शमवी आतां ॥ ३ ॥

तव पदरी असतां ताता, आडमार्गी पाऊल पडतां
सांभाळुनि मार्गावरता, आणिता न दुजा त्राता ।
(चाल) निज बिरूदा आणुनि चित्ता । तूं पतीतपावन दत्ता । वळे आतां आम्हांवरता ।
करूणाघन तू गुरूनाथा, मम चित्ता शमवी आतां ॥ ४ ॥

सहकुटुंब सहपरिवार, दास आम्हीं हे घरदार
तव पदी अर्पु असार, संसारा हीत हा भार ।
(चाल) परिहरिसी करूणासिंधो । तूं दीनानाथ सुबंधो । आम्हां अघलेश न बाधो ।
वासुदेव प्रार्थित दत्ता, मम चित्ता शमवी आतां ॥ ५ ॥
शांत हो श्री गुरूदत्ता मम चित्ता शमवी आतां ॥ धृ. ॥

## ॥ पद २ ॥

(चाल - इस तनधनकी)

श्री गुरूदत्ता जय भगवंता, ते मन निष्ठुर न करी आतां
॥ धृ. ॥ श्री गुरूदत्ता ॥
चोरें द्विजासी मारितां मन, जें, कळवळलें तें, कळवळों आतां ।
॥ श्री गुरूदत्ता ॥ १ ॥
पोटशुळानें द्विज तडफडतां, कळवळलें तें, कळवळों आतां ।
॥ श्री गुरूदत्ता ॥ २ ॥
द्विजसुत मरतां, वळलें तें मन, हो की उदासिन न वळे आतां ।
॥ श्री गुरूदत्ता ॥ ३ ॥
सतिपति मरतां काकुळति येता, वळले तें मन, न वळे कीं आतां ।
॥ श्री गुरूदत्ता ॥ ४ ॥
श्री गुरूदत्ता त्यजिं निष्ठुरतां, कोमळ चित्ता, वळवी आतां
श्री गुरूदत्ता जय भगवंता, तें मन निष्ठुर न करी आतां ।
॥ धृ. ॥ श्री गुरूदत्ता ॥

## ॥ पद ३ ॥

जय करूणाघन निजजन जीवन,अनसूयानंदन पाहि जनार्दन ॥ धृ. ॥ जय करूणाघन ॥
निज अपराधे उफराठी दृष्टी, होऊनि पोटीं भय धरूं पावन ॥ जय करूणाघन ॥ १ ॥
तूं करूणाकर, कधी आम्हांवर, रूससी न वरद कृपाघन ॥ जय करूणाघन ॥ २ ॥
वारी अपराध, तूं मायबाप, तव मनी कोपलेश न वामन ॥ जय करूणाघन ॥ ३ ॥
बालकापराधा, गणे जरि माता, तरी कोण त्राता, देईल जीवन ॥ जय करूणाघन ॥ ४ ॥
प्रार्थी वासुदेव, पदीं ठेवी भाव, पदीं देवो ठाव, देव अत्रिनंदन ॥ जय करूणाघन ॥ ५ ॥
जय करूणाघन निजजन जीवन, अनुसूयानंदन पाहि जनार्दन ॥ धृ॥ जय करूणाघन ॥

# ॥ पादुकांची प्रार्थना ॥

(पद – राग देस – चाल धुमाळी)

सांगावे, कंवणा ठाया जावे ।कवणा तें स्मरावें ।
कैसें काय करावें ।कवण्या परि मी रहावें ।
कवण येऊनि कुरूंदवाडीं स्वामीतें मिळवावें ॥ धृ.॥

या हारी जेवावें व्यवहारीं ।बोलावें संसारीं ।
घालुनि अंगिकारीं ।प्रतिपाळिशी जो निर्धारी ।
केला जो निजनिश्चय, स्वामी कोठें तो अवधारी ॥ १ ॥

या रानीं माझी करूणावाणी ।काया कष्टी प्राणी ।
ऐकुनि घेतिल कानी ।देशिल सौख्य निदानीं ।
संकटि होऊनि मूर्च्छित असतां, पाजिल कवण पाणी ॥ २ ॥

त्या वेळा सत्पुरूषांचा मेळा ।पाहतसे निजडोळां ।
लाविसि भस्म कपाळा ।सांडी भय तूं बाळा ।
श्रीपाद श्रीवल्लभ म्हणती अभय तुज गोपाळा ॥ सांगावे. ॥ ३ ॥

**॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥.......(१८ वेळा)**

## || श्री नरसिंह सरस्वती प्रार्थना ||

अनुसयत्मज हे जगपालका |
तुजविणा कुनी ना जगी बालका ||
तरि कथी स्मरू मी कवणाऽप्रति |
शरण मी नरासिंह सरस्वती || १ ||

मग मला गमला पथ हा बरा |
तव पदीच असो नित आसरा ||
पुरति हेतु कधी मम हेऽ कथी ||
करी दया नरासिंह सरस्वती || २ ||

मज कडोनिच घेऊनि चाकरी |
मगही देशिल योग्य न ते जरी ||
शिशुस मोबदला कुणि माऽगती |
कथी बरे नरासिंह सरस्वती || ३ ||

मति तुझ्या पदी अर्पिती किंकर |
अभय दे शिरी ठेवि गुरो कर |
स्थिरमति रमती नित प्राऽर्थिती |
करी दया नरसिंह सरस्वती || ४ ||

मदीय लोचन सार्थक जाहले |
सगुण सद्‌गुरू सद्रुप पाहीले ||
बघ मना रूप मंगल हेऽ किती |
करी दया नरसिंह सरस्वती || ५ ||

तव कृपेविण जीवची घाबरे |
अभय दे शिरी ठेविच हस्त रे |
तव पथा गुरूवासचि पाऽहती |
करी दया नरसिंह सरस्वती || ६ ||

बहुत भोगियल्या, गुरू आंपदा |
चुकवी दावि आता तुझिया पदा |
द्रुत गती अजि धावचि संऽकटी |
करी दया नरासिंह सरस्वती || ७ ||

कितीतरी आळवूं, तुज श्रीगुरू |
बहुतहि श्रमलें भवि लेकरूं ||
कशि दया तुजला लव येऽ न गा |
अनुसयात्मज भो मज पावगा || ८ ||

तुज समक्ष अरि मज गांजिती |
लवभरी तुजला कशी ना क्षिती ||
उगीच कां त्रिशूला धरिलेऽ अगा |
अनसुयात्मज भो मज पवगा || ९ ||

मदीय प्राण हरीलचि काळ तो |
मग तुझ्या उपयोगचि काय तो ||
म्हणूनि मी पुसतो कधी येशीऽगा |
अनसुयात्मज भो मज पावगा || १० ||

सदयता हृदयीं लव तूं धरी |
भजनी मंडळी हे लव तूं धरी |
स्वकीय आप्त रिपु आणि निंऽदका |
अनसुयात्मज हे जग पालका || ११ ||

अदयता धरिली अशि कां बरें |
भवपुरी बुडतो जीव घाबरे ||
पुरवि हेतु न मी गुरूदाऽस गा |
अनसुयात्मज भो मज पावगा || १२ ||

**अनसुयात्मज भो......... (३ वेळा)**

# शरणाष्टक

दत्तात्रेया तव शरणं । दत्त नाथा तव शरणं ।
त्रिगुणात्मका त्रिगुणातीत त्रिभुवनपालक तव शरणं ॥१॥

शाश्वतमूर्ते तव शरणं । शामसुंदर तव शरणं ।
शेषाभरणा शेषभूषणा शेषाशायी गुरू तव शरणं ॥२॥

षड् भुजमुर्ते तव शरणं षड् भुज यतिवर तव शरणं ।
दंडमंडलु गदा पदम ।शंखचक्रधर तव शरणं ॥३॥

करूणानिधे तव शरणं ।करूणा सागर तव शरणं ।
श्रीपाद श्रीवल्लभ गुरूवर ।नृसिंहसरास्वती तव शरणं ॥४॥

श्रीगुरूनाथा तव शरणं ।सद्गुरूनाथा तव शरणं ।
कृष्णासंगमि तरूतळवासी ।भक्तवत्सला तव शरणं ॥५॥

कृपामूर्ते तव शरणं ।कृपासागरा तव शरणं ।
कृपाकटाक्षा कृपावलोकन ।कृपानिधे प्रभु तव शरणं ॥६॥

कालांतका तव शरणं ।कालनशाका तव शरणं ।
पूर्णानंदा पूर्णरेशा ।पुराणपुरूषा तव शरणं ॥७॥

जगदीशा तव शरणं ।जगन्नाथा तव शरणं ।
जगत्पालका जगधीशा ।जगदोद्धारा तव शरणं ॥८॥

अखिलांतरा तव शरणं ।अखिलैश्वर्या तव शरणं ।
भक्तप्रिया वज्रपंजरा ।प्रसन्नवक्त्रा तव शरणं ॥९॥

दिगंबरा तव शरणं ।दीनदयाघन तव शरणं ।
दीनानाथा दीनदयाळा ।दीनोद्धारा तव शरणं ॥१०॥

तपोमूर्ते तव शरणं ।तेजोराशी तव शरणं ।
ब्रम्हानंदा ब्रम्हसनातन ।ब्रम्हमोहना तव शरणं ॥११॥

विश्वात्मका तव शरणं । विश्वरक्षका तव शरणं ।
विश्वंभरा विश्वजीवना । विश्वपरात्पर तव शरणं ॥ १२ ॥
विघ्नांतका तव शरणं । विघ्ननाशका तव शरणं ।
प्रणवातीता प्रेमवर्धना । प्रकाशमूर्ते तव शरणं ॥ १३ ॥

निजानंदा तव शरणं । निजपददायक तव शरणं ।
नित्य निरंजन निराकारा निराधारा तव शरणं ॥ १४॥

चिद्घनमूर्ते तव शरणं । चिदाकारा तव शरणं ।
चिदात्मरूपा चिदानंदा । चित्सुखकंदा तव शरणं ॥ १५॥

अनादिमूर्ते तव शरणं । अखिलावतारा तव शरणं ।
अनंतकोटि ब्रम्हाण्डनायक । अघटित घटना तव शरणं ॥ १६॥

भक्तोद्धारा तव शरणं । भक्तरक्षका तव शरणं ।
भक्तानुग्रह गुरूभक्तप्रिय । पतितोद्धारा तव शरणं ॥ १७॥

# श्री सद्‌गुरू ज्ञानदेव दत्तात्रय काजळकर महाराजांची स्तुती

गुरूराया तुझे लागले, गेले हरपुन मन ।
चित्त बुद्धी तुला अर्पण, लक्ष तुला वाहिले ॥
गुरू प्रार्थना आहे रामबाण, बुद्धि देता तुच जांण ।
सद्‌गुरू चरणी केली अर्पण, ब्रिद सांभाळी आपले ॥

सद्‌गुरू श्री ज्ञानदेव दत्तात्रय काजळकर महाराज की जय ॥१॥

सर्वाठायी गुरूमूर्ती साधुसंत योगी मुनी ।
सद्‌गुरू कृपा होताचि जाण, सर्व साधने झाली क्षिण ॥
धन्य गुरूराया दयाघन, एकनिष्ठ गुरू पाई ।
ध्यान सद्‌गुरू रायाचे तुटती, फास जन्म मरणाचे,
भय नाही महा काळाचे, ब्रम्हरूपी करी गुरूनाथ
तुझी प्रार्थना जो नित्य करी, तयासी साक्षात्कार देई
लवकरी वैखरी तुझसी ॥

सद्‌गुरू श्री ज्ञानदेव दत्तात्रय काजळकर महाराज की जय ।

**॥ अवधुत चिंतन श्री गुरूदेव दत्त ॥**

**‘दत्त आश्रम ’**

## नित्य गुरूवार सायंकाळी "दत्तबावनी"
### श्रीरंगावधूतस्वामी विरचित दत्तबावनी

या गुजराती दत्तबावनीचा पाठ शेकडो दत्तभक्त भाविक नेहमी करीत असतात. श्रीगुरूचरित्राचे सार असलेले हे स्तोत्र आहे. दत्तभक्तांकरीता हे गुजराती स्तोत्र आहे.

१. जय योगीश्वर दत्तदयाळ | तूज एक जगमां प्रतिपाळ ||
२. अत्र्यनसूया करी निमित्त | प्रगटयो जगकारण निश्चित ||
३. ब्रह्माहरिहरनो अवतार | शरणांगतनो तारणहार ||
४. अंतर्यामी सत् चित् सुख | बहार सद्गुरू द्विभुज सुमुख ||
५. झोळी अन्नपूर्णा कर मांह्य | शान्ति कमण्डल कर सोहाय ||
६. क्यांय चतुर्भुज षड्भुज सार | अनंतबाहु तुं निर्धार ||
७. आव्यो शरणे बाळ अजाण | उठ दिगंबर, चाल्या प्राण ||
८. सुणी अर्जुन केरो साद | रीझ्यो पूर्वे तूं साक्षात ||
९. दीधी ऋद्धि सिद्धि अपार | अंते मुक्ति महापद सार ||
१०. कीधो आजे केम विलंब | तुजविण मुजने ना आलंब ||
११. विष्णुशर्म द्विज तार्यो एम् | जम्यो श्राध्दमां देखी प्रेम ||
१२. जंभदैत्यथी त्रास्या देव | कीधी म्हेर तें त्यां ततखेव ||
१३. विस्तारी माया दितिसुत | इंद्रकरे हणाव्यो तूर्त ||
१४. एवी लीला कंई शर्व | कीधी वर्णवे को ते सर्व ||
१५. दोडयो आयु सुतने | काम कीधो एन तें निष्काम ||
१६. बोध्या यदुने परशुराम | साध्यदेव प्रल्हाद अकाम ||
१७. एवी तारी कृपा अगाध | केम सुणे ना मारो साद ||
१८. दोड अन्त ना देख अनंत | मा कर अधवच शिशुनों अंत ||
१९. जोई द्विजस्त्री केरो स्नेह | थयो पुत्र तुं निःसंदेह ||
२०. स्मरर्तृगामी कलितार कृपाळ | तार्यो धोबी छेक गमार ||
२१. पेटपीडथी तार्यो विप्र | ब्रह्मणशेठ उगार्यो क्षिप्र ||
२२. करे कैम ना मारी व्हार | जो आणिगम एकज वार ||
२३. शुष्क काष्ठने आण्यां पत्र | थयो केम उदासीन अत्र ? ||

२४. जर्जर वंध्या केरां स्वप्न | कर्यां सफळ तें सुतनां कृत्स्न ||
२५. करी दूर ब्राह्मणानो कोढ | कीधा पूरण एना कोड ||
२६. वंध्या भेंस दूझवी देव | हर्‍युं दारिद्र्य तें ततखेव ||
२७. झालर खाई रीझ्यो एम् | सुवर्णघट सप्रेम ||
२८. ब्राह्मणस्त्रीनो मरत भरथार | कीधो सजीवन तें निर्धार ||
२९. पिशाच पीडा कीधी दूर | विप्रपुत्र उठाड्यो शूर ||
३०. हरी विप्रमद अंत्यजहाथ | रक्ष्यो भक्त त्रिविक्रम तात ||
३१. निमेषमात्रे तंतुक एक | पहोंचाड्यो श्रीशैले देख ||
३२. एकी साथे आठ स्वरूप | धरी देव बहुरूप ||
३३. संतोष्या निजभक्त सुजात | आपी परचाओ साक्षात् ||
३४. यवनराजनी टाळी पीड | जातपातनी तने न चीड ||
३५. रामकृष्णरूपे तें एम | कीधी लीलाओ कंई तेम ||
३६. तार्या पथ्थर गणिका व्याध | पशुपंखी पण तुजने साथ ||
३७. अधम ओधारण तारूं नाम | गातां सरे न शां शां काम ||
३८. आधि व्याधि उपाधि सर्व | टळे स्मरणमात्रथी शर्व ||
३९. मूठचोट ना लागे जाण | पामे नर स्मरणे निर्वाण ||
४०. डाकण शाकण भेंसासुर | भूती पिशाचो जंद असुर ||
४१. नासे मूठी दइने तूर्त | दत्तधून सांभळता मूर्त ||
४२. करी धूप गाए जे एम् | दत्तबावनी आ सप्रेम ||
४३. सुधरे तेना बन्ने लोक | रहे न तेने क्यांये शोक ||
४४. दासी सिद्धि तेनी थाय | दुःख दारिद्र्य तेनां जाय ||
४५. बावन गुरुवारे नितनेम | करे पाठ बावन सप्रेम ||
४६. यथावकाशे नित्यनियम | तेने कदी न दंडे यम ||
४७. अनेक रूपे एज अभंग | भजतां नडे न माया - रंग ||
४८. सहस्त्र नामे नामी एक | दत्त दिगंबर असंग छेक ||
४९. वंदु तुजने वारंवार | वेदश्वास तारा निर्धार ||
५०. थाके वर्णवतां ज्यां शेष | कोण रांक हुं बहुकृत वेश ||
५१. अनुभव तृप्तिनो उद्गार | सूणी हसे ते खाशे मार ||
५२. तपसी तत्वमसि ए देव |बोलो जय जय श्रीगुरूदेव ||(३ वेळा)

# श्रीरामाची आरती

श्रीराम जय राम जय जय राम
आरती ओवाळू पाहू सुंदर मेघश्याम || धृ ||
दशरथ नंदन कौसल्यासूत (२)
राज्य अभिषेक होतो रामचंद्रास || १ ||
श्रीराम जय राम जय जय राम............
रत्न हिरे जडीत शोभे मुकूटी (२)
स्वर्गाहुनी देव पुष्प वर्षाव करीती || २ ||
श्रीराम जय राम जय जय राम............
भरत शत्रुघ्न दोघे चौरया ढाळीती (२)
सिंहासनी आरूढले जानकीपती || ३ ||
श्रीराम जय राम जय जय राम............
कनकाचे चाप हाती धनुष्य बाण (२)
हनुमंत पुढे उभे कर जोडून || ४ ||
श्रीराम जय राम जय जय राम............
विष्णुदास नामा म्हणे मागणे किती (२)
अखंडीत सेवा घडो राम चरणांसी || ४ ||
श्रीराम जय राम जय जय राम............

## || ध्यान ||

भक्तवत्सल भक्ताभिमानी राजाधीराज ||
प्रभू श्रीरामचंद्र भगवान की जय ||
पवनसुत हनुमान की जय ||
|| श्रीराम जय राम जय जय राम ||